TATA

TATA POWER

# दि टाटा पॉवर कंपनी मर्यादित

बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई - ४०००01, भारत
टेलि.: (९१२२) ६६६५ ८२८२, फॅक्स : (९१२२) ६६६५ ८८०१, वेबसाइट: www.tatapower.com
सीआयएन क्र.: एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७

## सार्वजनिक सूचना

**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड – पारेषण व्यवसायाच्या महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२२–२३ व आर्थिक वर्ष २०२३–२४ साठीच्या एकूण महसूली आवश्यकतेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२४–२५ साठीच्या एकूण महसूली आवश्यकतेचे तात्पुरते अचूक समायोजन आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग बहुवर्षीय वीजदर विनियम, २०२४ नुसार आर्थिक वर्ष २०२५–२६ ते आर्थिक वर्ष २०२९–३० साठीच्या प्रस्तावित एकूण महसूली आवश्यकतेला मान्यता देण्यासाठी याचिकेवरील सूचना/हरकती मागवण्याबाबत**

**(प्रकरण क्र. २०२४ चा १८५)**

१. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड – पारेषण व्यवसाय (टाटा पॉवर–टी) ने महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२२–२३ व आर्थिक वर्ष २०२३–२४ साठीच्या एकूण महसूली आवश्यकतेचे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२४–२५ साठीच्या एकूण महसूली आवश्यकतेचे तात्पुरते अचूक समायोजन आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोग बहुवर्षीय वीजदर विनियम, २०२४ नुसार आर्थिक वर्ष २०२५–२६ ते आर्थिक वर्ष २०२९–३० साठीच्या प्रस्तावित एकूण महसूली आवश्यकतेला मान्यता मिळण्यासाठी याचिका दाखल केली आहे.

२. आयोगाने प्रस्तुत याचिका दिनांक **९ डिसेंबर २०२४** रोजी दाखल करून घेतली आहे आणि टाटा पॉवर–टीला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ (२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करून प्रस्तुत सूचनेद्वारे जनतेकडून सूचना/ हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेची प्रमुख वैशिष्टे खाली देण्यात आली आहेत. त्यातील मान्यताप्राप्त आकडेवारी प्रकरण क्र. **२०२२** चा **२१७** मधील महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या **३१** मार्च **२०२३** रोजीच्या आदेशानुसार देण्यात आली आहे.

**तक्ता १: आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२४-२५ चे तात्पुरते अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० करिता एआरआरसाठी भांडवलीकरण (रूपये कोटी)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२२-२३ | | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष | मान्यताप्राप्त | प्रत्यक्ष | मान्यताप्राप्त | प्रस्तावित |
| भांडवलीकरण | ८२१.१६ | ८४१.९४ | ५६९.६१ | ७४५.७८ | २६०.३४ | ५६५.३३ |

| तपशील | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ |
|---|---|---|---|---|---|
| प्रस्तावित भांडवलीकरण | २३३७.०० | ४४०८.५५ | २३०६.०० | ६१५.०० | २०९०.०० |

**तक्ता २: आर्थिक वर्ष २०२२-२३ व आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी एकूण महसूली आवश्यकतेचे अचूक समायोजन आणि वर्ष २०२४-२५ साठी एकूण महसूली आवश्यकतेचे तात्पूरते अचूक समायोजन (रूपये कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२२-२३ | | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मान्यताप्राप्त | लेखपरिक्षित | मान्यताप्राप्त | लेखपरिक्षित | मान्यताप्राप्त | प्रस्तावित |
| १. | कार्यान्वयन आणि देखभाल (ओॲण्डएम) खर्च | २१८.८४ | ३०८.१४ | २२८.३८ | ३२०.६२ | २३९.२५ | २६१.३७ |
| २. | अतिरिक्त ओपेक्स | | ५.८३ | | २.३२ | | ०.०० |
| ३. | घसारा खर्च | २२३.६० | २२०.१३ | २५२.०२ | २५४.४५ | २६८.९७ | २८०.७२ |
| ४. | कर्ज भांडवलावर व्याजासह वित्तपुरवठा व पुनर्वित्तपुरवठा शुल्क | १३०.९६ | १४२.४२ | १४९.४५ | १९१.१० | १५१.६८ | २०८.०९ |
| ५. | खेळत्या भांडवलावरील (आयओडब्ल्यूसी) आणि ग्राहक सुरक्षा ठेवींवरील व्याज | १६.१५ | १६.०७ | १८.२९ | १९.८३ | १८.९२ | २१.३६ |
| ६. | आपत्कालीन साठ्यात योगदान | १२.६५ | १२.७१ | १४.७१ | १४.६८ | १६.१३ | १६.४८ |
| **७.** | **एकूण महसूली खर्च** | **६०२.१९** | **७०५.३१** | **६६२.८५** | **८०३.००** | **६९४.९४** | **७८८.०२** |
| ८. | अधिक: भागभांडवलावरील परतावा | २४०.४९ | २६९.०७ | २६९.६९ | ३०४.१७ | २८७.१२ | ३०१.७६ |
| **९.** | **एकूण महसूली आवश्यकता** | **८४२.६८** | **९७४.३७** | **९३२.५४** | **११०७.१७** | **९८२.०६** | **१०८९.७८** |
| १०. | वजा: दरेत्तर उत्पन्न | ४३.६८ | ५१.३२ | ४८.०४ | ३४.३९ | ५२.८५ | ३४.३९ |
| ११. | अधिक: कार्यान्वयन आणि देखभाल / खेळत्या भांडवलावरील व्याजाचे फायदे / (नुकसान) वाटपानंतर निव्वळ हक्क (एण्टायलटमेंट) | ० | (६०.४७) | ० | (४९.४६) | ० | ० |
| **१२.** | **प्रारेषण व्यवसायामधून निव्वळ एकूण महसूली आवश्यकता** | **७९९.०१** | **८६२.५८** | **८८४.५०** | **१०२३.३२** | **९२९.२२** | **१०५५.३९** |
| १३. | अधिक: मागील तफावत | | | ४१.१९ | ४१.१९ | (३.५२) | (३.५२) |
| १४. | वजा: वर्षादरम्यान पारेषण यंत्रणा वापरकर्त्यांकडून वसूल करण्यात आलेला एकूण महसूल | ८१६.२३ | ८१६.०३ | ९२५.७० | ९४०.७९ | | ९२५.७१ |
| **१५.** | **महसूल तफावत/ (अतिरिक्त)** | | **४६.५५** | | **१२३.७२** | | **१२६.१६** |

**तक्ता ३: आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० करिता प्रस्तावित एकूण महसूली आवश्यकता (रूपये कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ | आर्थिक वर्ष २०२५—२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल (ओॲण्डएम) खर्च | ३००.४१ | ३४०.४२ | ३८०.३६ | ४१२.४२ | ४४५.७२ |
| २ | अतिरिक्त ओपेक्स | ०.२० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | घसारा | ३४२.३१ | ४८०.५९ | ६१८.२३ | ६७८.११ | ७३३.५६ |
| ४ | कर्जावरील व्याजासह वित्तपुरवठा शुल्क | २७१.६० | ४४७.३९ | ६०९.७६ | ६४३.५१ | ६६५.२३ |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ३३.५३ | ३७.२९ | ४९.०५ | ५४.४१ | ५७.६६ |
| ६ | आपत्कालीन साठ्यात योगदान | १८.०३ | २३.८७ | ३४.८९ | ४०.६६ | ४२.२० |
| **७** | **एकूण महसूली खर्च** | **९६६.०७** | **१३२९.५६** | **१६९२.३०** | **१८२९.१०** | **१९४४.३६** |
| ८ | भागभांडवलावरील परतावा | ४०१.५७ | ५५८.४० | ७१४.५२ | ७८२.४३ | ८४५.३२ |
| **९** | **एकूण महसूली आवश्यकता** | **१,३६७.६४** | **१,८८७.९६** | **२,४०६.८२** | **२,६११.५४** | **२,७८९.६८** |
| १० | वजा: दरेत्तर उत्पन्न | ३६.११ | ३७.९२ | ३९.८१ | ४१.८० | ४३.८९ |
| ११ | निव्वळ एकूण महसूली आवश्यकता | १,३३१.५३ | १,८५०.०५ | २,३६७.०१ | २,५६९.७३ | २,७४५.७९ |
| १२ | मागील वसुली | ३८९.०९ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १३ | आर्थिक वर्ष २०२२–२३ व आर्थिक वर्ष २०२३–२४ आणि आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी वहन खर्च | ५६.७२ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **१४** | **एकूण वार्षिक महसूली आवश्यकता** | **१,७७७.३४** | **१,८५०.०५** | **२,३६७.०१** | **२,५६९.७३** | **२,७४५.७९** |

टिप: मागील वर्षातील तफावत तक्ता २ मध्ये गणन केल्यानुसार संबंधित वर्षांमध्ये प्रस्तावित आहे.

४. तपशीलवार याचिका दस्तावेज व कार्यकारी सारांश टाटा पॉवर–टीची वेबसाइट – **https://www.tatapower.com/investor-resource-center/regulatory** वर उपलब्ध आहेत, तसेच आयोगाची वेबसाइट **www.merc.gov.in** वर देखील डाऊनलोड करण्यायोग्य स्वरूपात (मोफत) उपलब्ध आहेत.

५. खालील कागदपत्रांच्या प्रती टाटा पॉवर–टीच्या कार्यालयांमध्ये लेखी विनंतीद्वारे उपलब्ध होतील.
अ. याचिकेचा कार्यकारी सारांश (मोफत मराठी किंवा इंग्लिशमध्ये).
ब. सीडीसह तपशीलवार याचिका दस्तावेज (इंग्लिशमध्ये) (**"दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड"** च्या नावे, मुंबई येथे देय १००/– रूपये रोख/धनाकर्ष याद्वारे प्रदान केल्यानंतर).
क. तपशीलवार याचिका दस्तावेज (इंग्लिशमध्ये) (रु. ५०/– शुल्क प्रदान करून).
ड. तपशीलवार याचिका दस्तवेजांची सीडी (इंग्लिशमध्ये) (रु. ५०/– शुल्क प्रदान करून).

| कार्यालय | पत्ता | टेलिफोन/फॅक्स क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | श्री. रवी अॅन्टोनी, दि टाटा पॉवर कंपनी लि., बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई– ४०० ००१. | टेलि.: (९१ २२) ६६६५ ७५४६ | rantony@tatapower.com |
| मुख्यालय | श्री. सैबल मित्रा, दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, कॉर्पोरेट सेंटर, 'ए' ब्लॉक, ४था मजला, कर्नाक रिसीव्हिंग स्टेशन, ३४ संत तुकाराम रोड, कर्नाक बंदर, मुंबई – ४०० ००९. | टेलि.: (९१ २२) ६७१७ १६५८ | saibal.mitra@tatapower.com |
| धारावी | श्री. गणेश तावरे, दि टाटा पॉवर कंपनी लि., शालीमार इंडस्ट्रीयल इस्टेटजवळ, माटुंगा (पश्चिम), मुंबई– ४०० ०१९. | टेलि.: (९१ २२) ६७१७ २४०४ | gstawre@tatapower.com |
| बॅकबे | सौ. अपूर्वा शिंदे, दि टाटा पॉवर कंपनी लि., बॅकबे रिसीव्हिंग स्टेशन, १४८, लेफ्टनंट जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई–४०० ०२१. | टेलि.: (९१ २२) ६७१७ २९३५ | apurva.shinde@tatapower.com |

६. आयोगाने टाटा पॉवर–टी ला या सूचनेद्वारे त्यांच्या याचिकेवर जनतेकडून सूचना/हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून, सूचना / हरकती नोंदवण्याची इच्छा असलेली प्रत्येक व्यक्ती आपल्या सूचना महाराष्ट्र वीज नियामक आयोग वेबसाइटवर (**www.merc.gov.in/e-public-consultation**) **'ई–सार्वजनिक कन्सल्टेशन'** टॅबद्वारे अपलोड करून इंग्रजी किंवा मराठी भाषेत लिखित स्वरूपात सादर करू शकते. उपलब्ध करून दिलेल्या या सुविधेमध्ये कोणतीही अडचण आल्यास, संबंधित भागधारक महाराष्ट्र वीज नियामक आयोग कार्यालयाशी मोबाईल क्रमांक: ८९२८०७१५२२ किंवा ईमेल आयडी: suggestions@merc.gov.in वर सर्व कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी १० ते संध्याकाळी ५ दरम्यान संपर्क साधू शकतात.

७. ज्या व्यक्तीने **'ई–सार्वजनिक कन्सल्टेशन'** टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केल्या आहेत त्या पुन्हा छापील स्वरूपात दाखल करण्याची गरज नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यम उपलब्ध नाही ते त्यांच्या सूचना आणि हरकती छापील स्वरूपात **'सचिव, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (एमईआरसी), १३वा मजला, केंद्र क्रमांक १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४०० ००५** यांना संबोधित करून, तसेच **दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड – ट्रान्समिशन, बॅकबे रिसीव्हिंग स्टेशन, १४८ लेफ्टनंट जनरल जे. भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१** (टेलि.: (९१२२) ६७१७ २९३५, ईमेल: vidyadhar.wagle@tatapower.com) यांच्या नावे सेवेच्या पुराव्यासह नोंदवू शकतात आणि असल्यास हरकती घेणाऱ्याचे संपूर्ण नाव, पोस्टल पत्ता व ई–मेल पत्ता सोबत ठेवू शकतात. **०३ जानेवरी, २०२५** रोजी संध्याकाळी ५ नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकतीं ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. तसेच, इतर कोणत्याही पद्धतीने दाखल केलेल्या सूचना/हरकतींचा विचार केला जाणार नाही.

८. टाटा पॉवर–टी प्राप्त झालेल्या सूचना/हरकतींना ती मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत उत्तर देईल, ते **०३ जानेवरी, २०२५** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना/ हरकतींना **०६ जानेवरी, २०२५** पेक्षा अधिक नसेल. टाटा पॉवर–टीने दिलेल्या प्रतिसादांवर, संबंधित व्यक्ती आपल्या पुरवण्या ई–सार्वजनिक (ऑनलाइन) सुनावणी दरम्यान किंवा **११ जानेवरी, २०२५** पर्यंत सादर करू शकतात.

९. **मुद्दा क्रमांक** ६ मध्ये दिल्याप्रमाणे ज्या व्यक्तीने आपली सूचना/हरकत सादर केली आहे आणि त्यांना ई–सार्वजनिक सुनावणीदरम्यान व्यक्तिगत स्वरूपात सुनावणी हवी असल्यास, त्यांनी/तिने सूचना / हरकती नोंदवताना त्याचा उल्लेख केला पाहिजे. अशा वेळी, वैध ईमेल आयडी आणि मोबाइल क्रमांक सादर करणे अनिवार्य असेल. आयोग आपल्या अधिकारांतर्गत अशा व्यक्तीला **०८ जानेवरी, २०२५ रोजी सकाळी १०:३०** वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या ई–सार्वजनिक सुनावणीमध्ये आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल, ज्यासाठी कोणतीही वेगळी सूचना दिली जाणार नाही.

१०. ई–सार्वजनिक सुनावणीला उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींनी आयोगाने १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जारी केलेल्या निर्देशांचे (आयोगासमोरील याचिकांच्या ई–सुनावणीसाठीच्या कार्यपद्धती आणि नियमावली) पालन करावे.

**स्वाक्षरी:**
विद्याधर एच. वागळे
प्रमुख – नियामक (पश्चिम विभाग)
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

स्थान : मुंबई
दिनांक : ११ डिसेंबर, २०२४

**SIZE: 16cm(W) x 35cm(H)**